सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण**
मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, नाशिक रोड, नाशिक - 422101
दुरध्वनी क्र. 0253-2461909 Email- kumbhmela.2027@mah.gov.in

क्र.ना.त्र्यं.कुभमेळा प्राधिकरण/10/2025. दिनांक-11/09/2025.

प्रति,

1.मा.जिल्हाधिकारी नाशिक.
2. मा.पोलिस आयुक्त, नाशिक शहर.
3. मा.आयुक्त, नाशिक महानगरपालिका नाशिक.
4. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग नाशिक.

विषय- कुंभमेळा 2027 साठी नाशिक महानगरपालिकेमार्फत करण्यात येणाऱ्या कामांबाबत दि. 02/09/2025 रोजी घेण्यात आलेल्या आढावा बैठकीचे इतिवृत्त.

महोदय/ महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सिंहस्थ कुंभमेळा 2027 साठी नाशिक महानगरपालिकेमार्फत करण्यात येणाऱ्या कामांबाबत दि. 02/09/2025 रोजी मा. अध्यक्ष नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

सदर बैठकीचे इतिवृत्त सोबत पाठविण्यात येत असून मा. विभागीय आयुक्त महोदय यांचे सूचनेनुसार सदर इतिवृत्तात नमूद केल्याप्रमाणे त्या-त्या विभागाशी संबंधित असलेल्या सूचनांप्रमाणे कार्यवाही करून त्याचा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा, ही विनंती.

आपली विश्वासू,

**Signed by Karishma Nandakumaran Nair**
**Date: 11-09-2025 15:58:55**

(करिष्मा नायर)
कुंभमेळा आयुक्त तथा सदस्य सचिव,
नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण

**महाराष्ट्र शासन**
**नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण**
**मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, नाशिक रोड, नाशिक - 422101**
**दुरध्वनी क्र.** 0253-2461909 **Email- kumbhmela.2027@mah.gov.in**

**कुंभमेळा 2027 साठी नाशिक महानगरपालिकेमार्फत करण्यात येणा-या कामांबाबत दि.02/09/2025 रोजी घेण्यात आलेल्या आढावा बैठकीचे इतिवृत्त**-:

दिनांक 02.09.2025 रोजी कुंभमेळा 2027 साठी नाशिक महानगरपालिकेमार्फत करण्यात येणाऱ्या कामांचा आढावा घेण्यासाठी डॉ. प्रवीण गेडाम, अध्यक्ष नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा विभागीय आयुक्त नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय आयुक्त कार्यालय नाशिक येथे बैठक घेण्यात आली. सदर बैठकीस खालील अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिका-यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| 1 | श्रीमती मनीषा खत्री | आयुक्त, नाशिक महानगरपालिका |
| 2 | श्रीमती करिष्मा नायर | आयुक्त, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण |
| 2 | श्री. रवींद्र भारदे | उपजिल्हाधिकारी नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण |
| 3 | श्री. प्रदीप चौधरी | अतिरिक्त आयुक्त मनपा नाशिक |
| 4 | श्री.संजय अग्रवाल | शहर अभियंता मनपा नाशिक |
| 5 | श्री. रवींद्र धारणकर | अधीक्षक अभियंता मनपा नाशिक |
| 6 | श्री. संजय आडेसरा | कार्यकारी अभियंता मनपा नाशिक |
| 7 | श्री. गणेश मैद | कार्यकारी अभियंता मनपा नाशिक |
| 8 | श्री. प्रशांत पगार | कार्यकारी अभियंता मनपा नाशिक |
| 9 | श्री. रितेश चव्हाण | सहाय्यक संचालक नगर रचना मनपा नाशिक |
| 10 | श्री. जे. बी. राऊत | मिळकत व्यवस्थापक मनपा नाशिक |

सदर बैठकीमध्ये पुढील मुद्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यात पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात आले-:

**पार्किंग-**

1. नाशिक महानगरपालिका, नाशिक शहर पोलीस आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एकत्रित बैठक घेऊन बाह्य वाहनतळ (आऊटर पार्किंग) च्या जागा निश्चित कराव्यात, जेणेकरून महानगरपालिका आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यामध्ये कामांची द्विरुक्ती होणार नाही किंवा कामे सुटणार नाहीत.

2. अधीक्षक अभियंता (बांधकाम विभाग), नाशिक महानगरपालिका आणि अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग नाशिक यांनी एकत्रितपणे बैठक घेऊन पार्किंगचे तांत्रिक निकष ठरवावेत.

3. उपनगर येथिल बाळ येशूच्या मंदिरासमोर इंडिया सेक्युरिटी प्रेस यांच्या मालकीच्या कर्मचारी वसाहतीच्या अनेक इमारती विनावापर पडून आहेत. त्यांची दुरुस्ती केल्यास तेथे कुंभमेळ्यामध्ये शासकीय कर्तव्यावरील कर्मचा-यांची निवासाची व्यवस्था कमी खर्चात होऊ शकते, असे महापालिकेतर्फे सांगण्यात आले आहे. त्या पध्दतीने कार्यवाही करण्यास तो पर्याय खुला ठेवून योग्य वाटल्यास त्याप्रमाणे कार्यवाही करण्यास हरकत नाही, असे अध्यक्षांनी सूचित केले.

**रामकालपथ-**

1. काळाराम मंदिराच्या समोरची (पूर्व) बाजू नीट दृष्टीस पडेल, अशा पद्धतीने मंदिरासमोरच्या सार्वजनिक व्यवस्थांचे ( पब्लिक अमेनिटीज) स्थान आणि परिमाण (डायमेंशन्स) ठेवावेत.

2. रामकालपथ प्रकल्पातील सर्व बांधकामे व अन्य कामे जुन्या नाशिक रामकुंड परिसरातील मंदिरांच्या वास्तुकलेशी सुसंगत (सेम आर्किटेक्चरल लँग्वेज) अशा पद्धतीचे असावीत. (उदाहरणार्थ छायेसाठी कॅनोपी इत्यादी.)

3. या सर्व परिसरामध्ये खांडकी किंवा तशा प्रकारचे दिसणारे रस्ते याचे किमान 3 वेगवेगळे पर्याय तयार करावे जेणेकरून ते कोणत्या योजनेतून प्रस्तावित करता येतील व त्यांची अंमलबजावणी कशा प्रकारे करावी, याबाबत निर्णय घेणे सुलभ होईल.

4. महत्वाचे डिझाईन्स हे अध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण यांच्याशी सल्लामसलत कल्यानंतरच अंतिम करावे.

**जलशुद्धीकरण यंत्रणा आणि संबंधित कामे, मलजलशुद्धीकरण व्यवस्था आणि संबंधित कामे-**

सदरची दोन्ही कामे मार्च 2027 पर्यंत पूर्ण होतील याची दक्षता घ्यावी. विशेषतः मलजलशुद्धीकरण यंत्रणा आणि संबंधित कामांची उपांगनिहाय कालमर्यादा दर्शविणारा आराखडा किंवा आलेख (उदाहरणार्थ बार चार्ट, सीपीएम किंवा पर्ट) सादर करावा.

Signed by
Praveen Nilkanthrao Gedam
Date: 09-09-2025 18:54:47

**( डॉ. प्रवीण गेडाम)**
**अध्यक्ष नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण**
**तथा विभागीय आयुक्त, नाशिक**